झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
पहिला मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
शिवाजीनगर, पुणे-४११०१६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/२९५१/२०२६
दिनांक : १२ / ८ /२०२६

**झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश**

प्रस्तावना -

स.नं.१४पै व १५पै (जुना) व नविन स.नं.१२/१, सि.स.नं.३००७ ते ३०३०, ३०३२, ३०३५ ते ३०३७, ३०४० ते ३०४७, ३०४९ ते ३०५१, ३०५३ ते ३०५६, सुभाषनगर, पिंपरी अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि,

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.२७/१०/२०२५ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दि.३१/१०/२०२५ रोजी डकविण्यात आली असून दि.३०/१०/२०२५ रोजीच्या दै.महाराष्ट्र टाईम्स् व दै. लोकमान्य सांजवार्ता या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, नोव्हेंबर २७ ते डिसेंबर ३, २०२५ मध्ये पृष्ठ क्र.४३ ते ४५ वर प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि ,

(३) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली मिळकत ही शासकीय मालकीची असून दि.२७/१०/२०२५ रोजी पूर्वसूचना आदेश प्रसिध्द करतेवेळी विकसक यांनी सदर मिळकतीचा मोजणी नकाशा सादर केला नव्हता व अंतिम ३ (क) आदेश पारित करणेपूर्वी मोजणी नकाशा सादर करणेच्या अटीवर झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कलम ३ (क) पूर्वसूचना प्रसिध्द करणेत आलेली होती. याबाबत, विकसक यांनी नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांचेकडील दिनांक ०१/०६/२०२६ रोजीचा मोजणी नकाशा या विभागास सादर केलेला आहे. सदर मोजणी नकाशाकरुन अनुसूचीमध्ये नमूद मिळकतीचे क्षेत्र ७६६८.०६ चौ.मी. इतके असलेचे दिसून येते. त्यानुसार अंतिम ३ (क) आदेशामध्ये याबाबत दुरुस्ती करुन अंतिम ३ (क) प्रसिध्द करणे आवश्यक वाटते. त्यामुळे कलम ३ (क) पूर्वसूचना आदेशामधील नमूद क्षेत्राऐवजी ७६६८.०६ चौ.मी. एवढे क्षेत्र नमूद करुन व मोजणी नकाशा नुसार चतु:सिमा नमूद करुन अंतिम ३ (क) आदेशामध्ये तसा बदल करणे क्रमप्राप्त आहे ; आणि

(४) ज्याअर्थी, सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सदर पूर्वसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार अब्दुल शहाबुद्दीन शेख व इतर

यांची ३(क) पूर्वसूचनेवर हरकत प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने स्वतंत्र निकालपत्रान्वये सदरची हरकत निकाली काढणेत आलेली आहे; आणि,

(५) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणूनघोषित करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि,

(६) ज्याअर्थी, सदर योजनेकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे क्षेत्र ७६६८.०६ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३(क) अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण ७६६८.०६ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश :-**

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे मुंबई ,येथे अपील दाखल करता येईल.

**अनुसूची क्र.१**
**सध्या अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीचे क्षेत्र**

**झोपडपट्टीचे नाव** :- स.नं.१४पै व १५पै (जुना) व नविन स.नं.१२/१, सि.स.नं.३००७ ते ३०३०, ३०३२, ३०३५ ते ३०३७, ३०४० ते ३०४७, ३०४९ ते ३०५१, ३०५३ ते ३०५६, सुभाषनगर, पिंपरी, जिल्हा-पुणे (Non Buildable)

**महानगरपालिका क्षेत्र** :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ.क्र | जमीन/ मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) (त्रिमितीय पध्दतीने येणारे क्षेत्र) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.१४पै व १५पै (जुना) व नविन स.नं. १२/१, सि.स.नं. ३००७ ते ३०३०, ३०३२, ३०३५ ते ३०३७, ३०४० ते ३०४७, ३०४९ ते ३०५१, ३०५३ ते ३०५६. | महाराष्ट्र शासन | ७६६८.०६ | स.नं.१४ व १५ ची उर्वरित मिळकत व लागू रस्ता | लागू पवना नदी | स.नं.१४ ची उर्वरित मिळकत व लागू श्री. झुलेलाल मंदिर लागु मिलिंद नगर, पिंपरी | लागू रस्ता व स.नं.१५ ची उर्वरित मिळकत |

अनुसूची क्र.२
ज्या ठिकाणी पुनर्वसन करावयाचे ते क्षेत्र

झोपडपट्टीचे नाव :- MIDC प्लॉट नं.GP -३१, पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, जिल्हा- पुणे.
महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे **मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव** | क्षेत्र (चौ.**मी.)** | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, पुणे | MIDC प्लॉट नं.GP -३१ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (भाडेपट्टाधारक - मे. रेनबो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी.) | १८१५३.०० चौ.मी. | शाळा जी.पी १३१, O/S II play ground | २४.०० मी रस्ता | १८.५ मी रस्ता | MIDC ESR, Plot No. GP १९७ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १२ / ८ /२०२६.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

१२/८/२५

**(सतीशकुमार खडके)** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे - यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
२. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ -यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम) या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.